13 MAY 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चार वर्षांत 20 नव्या महाविद्यालयांची भर

## शिवाजी विद्यापीठ संलग्नित कॉलेज वाढली; विद्यार्थ्यांना मिळाली त्यांच्या परिसरात शिक्षणाची सुविधा

डेटा रिसर्च

संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : दक्षिण महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाची ज्ञानगंगा असलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात गेल्या चार वर्षांत २० नव्या महाविद्यालयांची (कॉलेज) भर पडली आहे. त्यामुळे विद्यापीठ संलग्नित कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील एकूण कॉलेजची संख्या २८६ इतकी झाली आहे. त्यामध्ये कला, वाणिज्य आणि विज्ञान या पारंपरिक विद्याशाखांच्या कॉलेजची संख्या १९५ आहे. विविध अभ्यासक्रमांच्या कॉलेजची संख्या वाढल्याने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरात शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली आहे.


### बृहत आराखड्यात १९ महाविद्यालयांची तरतूद

- सध्या विद्यापीठाच्या सन २०२४-२५ ते २०२८-२९ या पंचवार्षिक बृहत आराखड्याचे काम सुरू आहे. त्यात नवीन महाविद्यालयांसाठी नियोजन समितीकडे ऑफलाईन स्वरूपात कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातून एकूण १९९ प्रस्ताव, तर ऑनलाईन गुगल फार्म प्राप्त संख्या ५१५० इतकी आहे. त्यातून एकूण १९ महाविद्यालयांची तरतूद करून मान्यतेचा प्रस्ताव शासनाला सादर केला जाणार आहे.


### जिल्हानिहाय महाविद्यालयांची संख्या

| अभ्यासक्रमनिहाय | कोल्हापूर | सांगली | सातारा |
|---|---|---|---|
| कला, वाणिज्य व विज्ञान | ८३ | ५८ | ५४ |
| विधी | ३ | ४ | २ |
| अभियांत्रिकी | १५ | ५ | ५ |
| शिक्षणशास्त्र | १७ | १२ | ७ |
| शारिरीक शिक्षणशास्त्र | ३ | १ | ० |
| औषधनिर्माणशास्त्र | ७ | ५ | ४ |
| मान्यताप्राप्त संस्था | १ | ० | ० |
| एकूण | १२९ | ८५ | ७२ |

### बृहत आराखड्यास अनुसरून मंजूर महाविद्यालये




### अनुदानित-विनाअनुदानित महाविद्यालये




‘शासन निर्णयानुसार आणि स्थानिक विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेवून शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात महाविद्यालयांची सुरूवात आणि नव्या महाविद्यालयांची तरतूद करण्यात आली आहे. नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी महाविद्यालयांनी करावी. बहुविद्याशाखीय शिक्षण, अभ्यासक्रम त्यांनी सुरू करावेत.

**-व्ही. एस. सोयम**, उपकुलसचिव, संलग्नता विभाग

13 MAY 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## महाविद्यालयांकडे जबाबदारी; पदवीस्तर प्रथम वर्ष

# परीक्षांना २५ मेपासून प्रारंभ

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवीस्तरावरील परीक्षा (प्रथम आणि द्वितीय वर्ष-सत्र १,२, ३ आणि ४) महाविद्यालय पातळीवर २५ मे पासून होणार आहेत. त्यात बी. ए., बी. कॉम., बीसीए., आदी पारंपरिक अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

या अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे वेळापत्रक, प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन अशी सर्व परीक्षाविषयक कामाची जबाबदारी महाविद्यालयांवर आहे. दूरशिक्षण केंद्रांकडील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन ज्या-त्या महाविद्यालयातील प्राचार्य अथवा दूरशिक्षण केंद्राच्या समन्वयकांनी करायचे आहे. पदविका, पदव्युत्तर पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या



परीक्षा महाविद्यालय आणि अधिविभागस्तरावर होणार आहेत. महाविद्यालयस्तरावरील परीक्षा १५ ते २५ जून, तर विद्यापीठातील अधिविभागांच्या पातळीवर १ ते १५ जून या कालावधीत परीक्षा घेण्यात याव्यात, अशा सूचना परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी महाविद्यालय, अधिविभागांना शुक्रवारी केल्या आहेत.

महाविद्यालयांना परीक्षा घेण्याची मुदत

| अभ्यासक्रम | प्रथम वर्ष (सत्र १ आणि २) | द्वितीय वर्ष (सत्र ३ व ४) |
|---|---|---|
| बी. ए., बीबीए., बी. ए. (मल्टिमिडिया, डिफेन्स स्टडी, इतर बी. व्होक परीक्षा) | ता. २५ मे ते १० जून | ता. १ ते २० जून |
| बी. कॉम., बीसीए., बी. कॉम (बिझनेस मॅनेजमेंट, बँक मॅनेजमेंट व इतर) | ता. २५ मे ते १० जून | ता. १ ते २० जून |
| बी. एस्सी., बीसीए., बी. एस्सी. (बायोटेक, शुगरटेक, आयटी व इतर) | ता. १ ते २० जून | ता.७ ते २५ जून |

## १८९६ विद्यार्थ्यांनी दिली 'एमएचटी-सीईटी'

■ कोल्हापूर जिल्ह्यातील विविध केंद्रांवर शुक्रवारी अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची 'एमएचटी-सीईटी' परीक्षा १८९६ विद्यार्थ्यांनी दिली, तर ४७ जण गैरहजर राहिले. या परीक्षेसाठी एकूण १९४३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.

लोकमत

# पदवीच्या सत्र परीक्षा २५ पासून

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांच्या मार्च / एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी स्तरावरील पारंपरिक अभ्यासक्रमाच्या सत्र परीक्षा (प्रथम व द्वितीय वर्ष) २५ मेपासून सुरू होणार आहेत. प्रथम वर्ष बीए, बीबीए, बी.कॉम, या अभ्यासक्रमांच्या परीक्षा २५ ते १० जून या कालावधीत होणार आहेत. तर याच अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षाच्या परीक्षा १ जून ते २० जून या कालावधीत होणार आहेत. बीसीए, बीएस्सीच्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा १ जून ते २० जून या कालावधीत होणार आहेत.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात शिका बोन्सायची कला

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग व बोन्साय क्लब, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. १६) सायंकाळी ४ वाजता विद्यापीठातील वि.स. खांडेकर सभागृहात 'बोन्साय-एक जपानी कला' हा कार्यक्रम आयोजित केला आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून विद्यार्थी, शिक्षक व नागरिक अशा सर्वांनी या कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# डिप्लोमा, सर्टिफिकेट अभ्यासक्रमांच्या विद्यापीठ अधिविभाग, महाविद्यालय स्तरावर परीक्षा होणार

## १ ते २५ जून कालावधी; वेळापत्रक संकेतस्थळावर जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील डिप्लोमा, पीजी डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्सेस अभ्यासक्रमाच्या परीक्षा विद्यापीठ अधिविभागस्तरावर एक जून तर महाविद्यालयामध्ये १५ जूनपासून सुरू होणार आहेत.

विद्यापीठाकडून डिप्लोमा, पीजी डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्सेस अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा महाविद्यालय, अधिविभाग स्तरावर ऑफलाईन पद्धतीने परीक्षा केंद्रावर प्रत्यक्ष हजर राहून घेण्यात येणार आहेत. त्यानुसार महाविद्यालय स्तरावरील परीक्षा १५ ते २५ जून याकालावधीत होतील. विद्यापीठ अधिविभागाच्या परीक्षा १ ते १५ जूनपर्यंत चालतील.

परीक्षेचे वळापत्रक तयार करणे, वेळापत्रक प्रसिद्ध करणे, प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन व नियोजन करून सुरळीतपणे पार



पाडण्याची संबंधित महाविद्यालय, अधिविभाग यांच्यावर जबाबदारी असेल. दिव्यांग विद्यार्थ्यांना सोयी-सवलती असतील. त्यांना परीक्षेसाठी २० मिनिटे अधिक वेळ दिला जाईल. विद्यार्थ्यांना पूर्वपरवानगीने लेखनिक, सहायक घेता येईल. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकानुसार परीक्षेचे नियोजन करावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

### ...अशी होणार परीक्षा

विद्यापीठाकडून मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी स्तरावरील सर्व पारंपरिक अभ्यासक्रमांच्या प्रथम आणि द्वितीय वर्ष सत्र (१, २, ३ व ४) परीक्षा महाविद्यालयस्तरावर घेतल्या जाणार आहेत. बी.ए., बी.बी.ए., बी.ए. (मल्टीमीडिया, डिफेन्स स्टडी इतर बी.व्होक सर्व परीक्षा) व बी.कॉम. बी.सी.ए., बी.कॉम (बिझनेस मॅनेजमेंट, बँक मॅनेजमेंट व इतर) प्रथम वर्ष सत्र १ व २ परीक्षा २५ मे ते १० जून तर द्वितीय वर्ष सत्र ३ व ४ च्या परीक्षा १ ते २० जून या कालावधीत होतील. बी. एस्सी. बी.सी.ए. बी.एस्सी. (बायो-टेक शुगरटेक, आयटी. व इतर) अभ्यासक्रम प्रथम वर्ष सत्र-१ व २ परीक्षा १ ते २० जून तर द्वितीय वर्षातील सत्र३ व ४ च्या परीक्षा ७ ते २५ जून दरम्यान होतील.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात पर्यावरण संवाद कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पर्यावरणाच्या साखळीत माणूस हा शेवटचा घटक असूनही आपण निसर्गाच्या विरोधात जाऊन निसर्गाने आखून दिलेल्या रूपरेषा ओलांडत आहोत. त्यामुळे मानवाचे भवितव्य धोक्यात आहे. यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या पर्यावरण जागतिक परिषदांच्या शाश्वत विकासाची उद्दिष्टे व मार्गदर्शक तत्त्वे लक्षात घेऊन प्रत्येक राष्ट्राने पर्यावरणविषयक जबाबदाऱ्या पाळल्या पाहिजेत, असे मत ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ प्रा. डॉ. जय सामंत यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागात शुक्रवारी पर्यावरण संवाद या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात ही कार्यशाळा पार पडली. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. यावेळी डॉ. शिंदे यांनी शिवाजी विद्यापीठातील जलसंवर्धनाच्या उपक्रमांची माहिती दिली. कार्यशाळेदरम्यान विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी पर्यावरण आणि माध्यमे या विषयावर, तर ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड यांनी पर्यावरणविषयक भारतातील चळवळी तसेच प्रा. पी. डी. राऊत यांनी माध्यमातील पर्यावरणविषयक आशय आणि समस्या यावर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी आयक्युबेशन सेंटरविषयी माहिती दिली. प्रास्ताविक आणि पाहुण्यांचे स्वागत अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले.

तरूण भारत

# पदविका, पदव्युत्तर पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी जूनमध्ये ऑफलाईन परीक्षा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठांतर्गत उन्हाळी सत्रातील पदविका, पदव्युत्तर पदविका, सर्टिफिकेट कोर्सेस अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे नियोजन महाविद्यालयीन स्तरावर केले जाणार आहे. त्यासाठी विद्यापीठ अधिकार मंडळांनी मान्यता दिली आहे. डिप्लोमा, पीजी डिप्लोमा आणि सर्टिफिकेट कोर्सेसच्या परीक्षा ऑफलाईन होणार आहेत. महाविद्यालयीन स्तरावर १५ ते २५ जून दरम्यान तर विद्यापीठ अधिविभाग स्तरावर १ ते १५ जून दरम्यान या परीक्षा होणार आहेत. यासंदर्भात नियोजन करण्याची सुचना परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केली आहे.

पदवी स्तरावरील पारंपरीक अभ्यासक्रमांसाठी महाविद्यालयांतही परीक्षा

पदवी स्तरावरील पारंपरीक अभ्यासक्रमांच्या प्रथम आणि द्वितीय वर्ष सत्र १, २, ३ आणि ४ च्या परीक्षा महाविद्यालयीन स्तरावर ऑफलाईन होणार आहेत. यामध्ये बी.ए., बी.

- विद्यापीठातील परीक्षा, मूल्यमापन मंडळाची माहिती

सी.ए.,(मल्टीमिडीया, डिफेन्स स्टडी व इतर) साठी प्रथम वर्ष सत्र १ आणि २ साठी २५ मे ते १० जूनदरम्यान परीक्षा होणार आहेत. द्वितीय वर्ष सत्र ३ आणि ४ साठी १ जून ते २० जून दरम्यान परीक्षा होणार आहेत. बी. कॉम., बी.सी.ए., बी.कॉम., (बिझनेस मॅनेजमेंट, बँक मॅनेजमेंट व इतर) अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्ष सत्र १ व २ साठी २५ मे ते १० जून तर द्वितीय वर्ष सत्र ३ आणि ४ साठी १ जून ते २० जून दरम्यान ऑफलाईन परीक्षा होणार आहेत. तसेच बी.एस्सी., बी.सी.ए. बी.एस्सी. (बायोटेक, शुगरटेक, आयटी व इतर) या अभ्यासक्रमांची प्रथम वर्ष ऑफलाईन परीक्षा १ जून ते २० जून दरम्यान तर द्वितीय वर्ष सत्र ३ आणि ४ साठी ७ जून ते २५ जून दरम्यान परीक्षा होणार आहेत. त्याचे वेळापत्रक महाविद्यालयांनी तयार करून नियोजनाच्या सुचना केल्याची माहिती डॉ. जाधव यांनी दिली.